CNR No. MHWR030057142021
**नि. फौ. ख. क्र. ८२६/२०२१**
**सरकार / ॠतवीक**
**<u>नि.क्र. १७</u>**

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची शपथेवर साक्ष

मी सत्य प्रतिज्ञेवर सांगतो की —

माझे नाव : अंकित सुनिल जिभे,

वय : ३२ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
रा. : देशपांडे ले आउट, वर्धा, ता. जि. वर्धा.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. एन. काळे मार्फत</u>**

१. मी सन २०२१ मध्ये वर्धा सायबर सेल येथे पोलिस शिपाई, ब.नं. ८६४, या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी मला पोलिस स्टेशन रामनगर अंतर्गत दाखल गुन्हा क्र. २२६/२०२१ संबंधी इंस्टाग्रामबाबत माहिती मिळण्याचे पत्र प्राप्त झाले होते. त्यामुळे मी सदर माहिती मिळण्याकरीता इंस्टाग्रामच्या कार्यालयाकडे म्हणजे Facebook Inc US कडे पत्र व्यवहार केला होता. मी त्यामध्ये 'Samiksha_Patil.pvt' या आयडीबाबत ते अकाउंट कोणी तयार केले व त्याचे सलंग्न मोबाईल क्रमांकाबाबत माहिती मागितली होती. त्या पत्राची प्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यावर पोलिस अधिक्षक श्री. होळकर यांची सही आहे. मी श्री. होळकर साहेबांसोबत कार्यरत होतो व वारंवार त्यांचे पत्र व्यवहार बघत होतो आणि त्यामुळे मी त्यांची सही ओळखतो. सदर पत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे.

२. त्यानंतर आम्हांला फेसबुकव्दारे सदर माहिती मिळाली होती. त्यामध्ये आम्हांला सदर इंस्टाग्राम आयडीचा सलंग्न मोबाईल क्रमांक व आयपी ॲड्रेस मिळाला होता. त्यानुसार मी पुरविण्यात आलेला मोबाईल क्र. ९१७५०९३१९० चा एसडीआर काढला होता. सदर मोबाईल क्रमांक सविता राउत यांच्या नावाने नोंद होता. त्यामुळे मी सदर माहिती माझे अहवालासह संबंधीत पोलिस स्टेशनला दिली होती. मी पोलिस स्टेशनला ती माहिती प्रिंट आउट काढून दिली होती. मी सदर माहितीसोबत माझे नावे भारतीय पुरावा कायदाचे कलम ६५—ब चे प्रमाणपत्र दिले होते. ते अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास नि.क्र. **पी—३/पीडब्ल्यु२** देण्यात येते.

३.        मी सदर माहिती माझे ताब्यातील आमचे कार्यालयातील संगणकातून दिली होती. मी सदर संगणक वापरत व हाताळत होतो.

**सर तपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्रीमती आर. एस. वीर मार्फत</u>**

४.        हे म्हणणे खरे नाही की, मला पोलिस स्टेशनमार्फत माहिती मिळण्याकरीता पत्र प्राप्त झाल्याचे, त्यानुसार मी पत्र व्यवहार करून सदर माहिती मिळविल्याचे आणि ती पोलिसांना पुरविल्याचे खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याकरीता फेसबुककडे पत्र व्यवहार करून ती माहिती मिळविल्याचे सुध्दा खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे व चुकीचे प्रमाणपत्र दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

सा. वा. दा. ब. अ. क. के.

माझे समक्ष,

VICKRANT PRALHAD KHANDARE
Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.03.13 17:30:15 +0530

न्यायदंडाधिकारी, प्र.व., वर्धा.
दिनांक : १३/०३/२०२६

( वि. प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)